


# मीफॉरमायसिटी कॅनरा एचएसबीसी ओरिएंटल बॅंक ऑफ कॉमर्स लाइफ इन्शुरन्सचा उपक्रम

0

BY ADMIN ON NOVEMBER 27, 2018 मुंबई

मुंबई, दि. 26 : कॅनरा एचएसबीसी ओरिएंटल बॅंक ऑफ कॉमर्स लाइफ इन्शुरन्सने स्वच्छ आणि सुंदर शहराच्या गरजेबद्दल जागरूकता पसरवण्यासाठी रेडिओ मिर्चीशी भागिदारीत आज मीफॉरमायसिटी हे कॅम्पेन मुंबईच्या लोअर परेल भागातील हायस्ट्रीट फिनिक्स मॉलमध्ये सुरु केले आहे. दिल्ली, गुरुग्राम आणि मोहाली येथे यशस्वी लॉंच केल्यानंतर हा उपक्रम देशाच्या आर्थिक राजधानीत मुंबईत लॉंच करण्यात आले आहे. हा उपक्रम लोकांना शहरातील स्वचछता वाढवण्यासाठी आणि भिंतींवर ग्राफिटी आर्टद्वारे कलाकुसर करून भारतीय कलेची अनुभूती देण्याच्या उपक्रमात सहभागी होण्यासाठी प्रेरणा देणारा आहे. मुंबईसाठीचा संदेश प्रॉमिस मुंबई करेगा या संकल्पनेवर आधारित असून त्याद्वारे मुंबई स्वच्छ आणि सुंदर केली जाणार आहे. या कार्यक्रमात प्रसिद्ध बॉलिवूड गायक केके यांचा कॉन्सर्ट आयोजित करण्यात आला होता व त्यानंतर ग्राफिटीचे अनावरण करण्यात आले. श्री. अनुज ठाकूर, व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, कॅनरा एचएसबीसी ओरिएंटल बॅंक ऑफ कॉमर्स लाइफ इन्शुरन्स म्हणाले, मीफरमायसिटी कॅम्पेन हे आमची देशाप्रती आणि इतथले लोक व आम्ही राहातो त्या समाजाप्रती असलेली बांधिलकी दर्शवणारे आहे. आमचा विश्वास आहे, की ही चळवळ सर्वांना आपलीशी वाटेल आणि ती शहरात सकारात्मक बदल घडवून आणेल.

एक ब्रॅंड या नात्याने आम्हाला आमचे अस्तित्व ग्राहक आणि समाजाला त्यांनी आपल्या प्रियजनांना दिलेली आश्वासने पूर्ण करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर मदत करण्यासाठी आहे. आम्ही आमच्या कंपनीतील प्रत्येकाला यात सहभागी होण्याचे आणि शाश्वत पद्धतींची अंमलबजावणी करण्यासाठी आपले योगदाने देण्यात व त्यायोगे पर्यावरणावर सकारात्मक परिणाम करण्याचे आवाहन करतो. लोकांना शिक्षित करण्याचे महत्त्व आम्ही जाणतो व म्हणूनच आम्ही अशाप्रकारचे जागरूकता अभियान राबवत राहू तसेच कर्मचाऱ्यांना सातत्याने पर्यावरणासाठी पूरक उपक्रमांत स्वयंफूर्तीने सहभफागी होण्यासाठी प्रेरित करू.